

The Telegraph

FASHION MOOD
Welcome the mob wife aesthetic t2

LEOPARD LEAP
Numbers in the wild rise by 1,000 P4

WIDE NET
The Internet impedes enquiry and empathy P10

YOUNGSTERS DELIVER
18-year-old Danns nets 2 in Liverpool win P14

34 PAGES CALCUTTA FRIDAY 1 MARCH 2024 ₹6.00 www.telegraphindia.com


WEST BENGAL | CALCUTTA FRIDAY 1 MARCH 2024

MUSIC t2 ONLINE

# Sahaj Parav Season 6 was a revival of folk-art forms, celebrated with grandeur at Calcutta.

By Abhishek Mukherjee

Published:1 Mar 2024, 12:37AM

**The sixth season of Sahaj Parav: The Root Music Festival,** was held on February 16 and 17 at the Indian Museum courtyard. It is a unique initiative — undertaken by Lopamudra Productions and Dohar — that aims to showcase a wide variety of folk art and cultural forms in a common space every year.



A performance of **Gondhali music**, delivered by **Haridas Shinde** (second from left) and his troupe, brought the first day of the event to a close. Their energetic performance left everyone in awe. **"We have come here to deliver traditional Maharashtrian music,** and as performers, our joy knows no bounds. At a time when our ancient musical instruments, our songs and traditions are fading into obscurity, an event such as **Sahaj Parav** that aims to spread folk music and culture, is a remarkably outstanding initiative," said Haridas Shinde.

# Sing song

Bavdhan Citizens Forum and Sangeet Satsang Group present a musical evening of devotional and Sufi Songs mentored by renowned tabla player Uday Ramdaas. The event will also feature well-known folk artiste Haridas Shinde. Free car drop facility is available after the event for senior citizens and chairs will be provided for them as well. Call the numbers below to register for the event.

**WHERE:** Swami Vivekanand Sports Complex, Tinsel Town Road **WHEN:** December 18, 6.30 pm onwards **COST:** Rs 50
**CALL:** 8888858725, 9850205902



लोकमत



देशविदेशातील अनेक कलावंत ऑनलाईन पद्धतीने लोककला व संस्कृतीचे शिक्षण हरिदास यांच्याकडून घेत आहेत.

प्रामुख्याने आंतरराष्ट्रीय स्तरावरील सांस्कृतिक कला-प्रदर्शनात त्यांनी संबळ वादनाचे प्रात्यक्षिक सादर करून या कलाप्रकाराचा वेगळाच ठसा उमटविला आहे. मोठमोठ्या फेस्टिव्हलमधून संबळ वादनाचे प्रात्यक्षिक सादर करून रसिक प्रेक्षकांची वाहवा मिळविली आहे. 'रणधुमाळी' नावाचे शंभर कलाकारांचे संबळवादक पथक तयार करून, महाराष्ट्रातील लोककलेच्या वाद्यांची पथके निर्माण करून ग्रामीण भाग, लोकवस्त्या, शहरी संस्कृतीत मोठमोठ्या शहरांतील चमचमत्या दुनियेतही आपल्या संबळवादन कलेचा सांस्कृतिक जागर, प्रचार व प्रसार त्यांनी केला आहे.

पाश्चात्य व लोकसंगीताचा मेळ घालून 'फ्यूजन' स्वरूपाचे अनेक कार्यक्रम त्यांनी सादर केले आहेत. अनेक टीव्ही सिरीयल, वाहिन्या, यू-ट्यूब चॅनल, रिॲलिटी शो यांसारख्या कार्यक्रमांच्या माध्यमातून चमचमत्या दुनियेतही लोकसंस्कृतीचा जागर करीत वाहवा मिळविली आहे. दोन हजारांपेक्षा अधिक कार्यक्रम राज्यात, राज्याबाहेर, देशपातळीवर करून त्यांनी लोकसांस्कृतिक चळवळीचे संगीत जिवंत ठेवले आहे.

तबला या वाद्याचे दैवत उस्ताद झाकीर हुसेन यांचे बंधू तौफिकभाई कुरेशी, शास्त्रीय गायिका पद्मश्री शुभा मुद्गल, ज्येष्ठ तबलावादक पंडित अनिश प्रधान या दिग्गज कलाकारांसोबत संबळ वादनाची मैफल हरिदास शिंदे यांनी रंगविली आहे. सन २०१७ मध्ये 'आब्बाजी की बरसी' (पंडित झाकीर हुसैन यांच्या वडिलांची पुण्यतिथी) निमित्ताने हरिदास शिंदे यांच्या स्वतंत्र संबळवादनाचा कार्यक्रम झाला व हरिदास शिंदे यांची पाठ उस्ताद झाकीर हुसेन यांनी थोपटली होती.

गावच्या शेतीशीही हरिदास यांची घट्ट नाळ जुळलीय. वेळ मिळेल तेव्हा ते शेतीत रमतात. दुसरीकडे नगर आणि पुण्यामध्ये हीच संबळवादनाची कला इतरांना देण्यासाठी हरिदास यांना सिंबायोसिस, फ्लेम इन्स्टिट्यूट, कला कोस्ट इन्स्टिट्यूट अशा संस्थांमधून खास बोलावणं असतं. यात अनेक परदेशी तरूण-तरुणीही संबळ वादनाची कला हरिदास यांच्याकडून शिकताहेत. लोककलेच्या अभ्यासासाठी हरिदास यांना भारत सरकारची शिष्यवृत्ती मिळाली आहे. ज्यांना कुणाला याची आवड आहे, त्या सर्वांना संबळ वादनाची ही कला शिकवण्यासाठी आपण उत्सुक असल्याचं ते सांगतात. संबळसारख्या एका दुर्लक्षित झालेल्या कलेला हरिदास केवळ पुढे नेताहेत एवढंच नाही, तर अनेक राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय महोत्सवांतूनही हिरिरीने भाग घेत लोककलेचा जागरही मांडतात.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने स्वामी विवेकानंद पुरस्कार देऊन, नगरच्या सरगम मित्रमंडळाने सरगम पुरस्काराने, अण्णा भाऊ साठे प्रतिष्ठान (पुणे) यांनी कलाउपासक पुरस्काराने आणि एका वृत्तवाहिनीने अन्य सन्मान देऊन हरिदास यांचा गौरव केला आहे. अशा या लोकसंस्कृतीचा जागर करणाऱ्या हरहुन्नरी कलावंताच्या कार्याचा नगरच्या मातीला अभिमान वाटतो.

लोकमत

# पुढेही कलेचा जागर सुरुच....

दुसरे चिरंजीव हरिदास शिंदे हेसुद्धा प्रतिभावान वारकरी कीर्तनकार. शास्त्रीय संगीतात त्यांनी एमए (संगीत)पर्यंत शिक्षण घेतले आहे. वारकरी शिक्षण संस्थेमधून वारकरी परंपरेचे प्रतिभावान गायक व कीर्तनकार म्हणून व लोककला व सांस्कृतिक चळवळीचे अभ्यासक म्हणून देशभर त्यांचा लौकिक आहे. रक्तातच संगीत असल्याने, त्यांच्या कुळालाच राजदरबारातील गायकीचा मोठा वारसा असल्याने, लोकसंस्कृतीचा जागर करणाऱ्या गोंधळी समाजाची परंपरागत पार्श्वभूमी असल्याने, हरिदास शिंदे यांनी आपल्यातील जातिवंत कलाकारीने साहित्य संस्कृतीच्या कलेचा जागर सुरुच ठेवला आहे.

Hello Ahmednagar
Page No. 6 Aug 20, 2023
Powered by: erelego.com

लोकमत

हरिदास शिंदे हा एक नगरच्या मातीतला लढवय्या युवा कलाकार. म्हटलं तर शेतकरी. लोककलेची परंपरा हरवत चालल्याची खंत सध्या अनेक ठिकाणी ऐकायला मिळते. मात्र, याच लोककलेची एक अनोखी परंपरा पुढे नेण्याचा ध्यास या तरुणाने हाती घेतलाय. बहुरूपी, जागरण गोंधळाचे सुमारे एक हजारहून अधिक प्रयोग हरिदासने केलेत. संत वाङ्मयातील लोकसंगीत हा हरिदासचा अत्यंत आवडीचा विषय. आई भवानीमातेचा उदोऽ उदोऽऽ असा गजर ऐकला की आपल्याला या संबळ वाद्याची आठवण येतेच येते. संबळ, दिमडी, टाळ ही पारंपरिक वाद्ये लोककलेचा जणू प्राण. हरिदास शिंदे या तरुणाने हीच कला जगभर पोहोचविण्याचा विडा उचललाय. हरिदासजी यांच्याविषयी आणखी माहिती लिहिण्याआधी त्यांची पूर्वपीठिका जाणून घेणे महत्त्वाचे ठरेल. हरिदासजी यांची लोकसंगीताशी नाळ कशी जुळली, याचा उलगडाही त्यातून होईल.

लोकमत

# नाद संबळाचा

अरुण आहेर



शाहिरी कलावंत



महाराष्ट्राच्या लोकसंस्कृतीमधील अठरापगड जातींमध्ये विखुरलेले अठरापगड लोककलावंत, जसे- गोंधळी, नाथपंथी, धनगर-वाघे, डवरी-भराडी, पोतराज, आराधी, भोपे, जोगते, वासुदेव, गुडगुडीवाला पिंगळा ज्योतिषी, नंदीवाले जोशी, भाट, दरवेशी... संगीतकलेचा वारसा असलेली; काव्य, गायनातून लोकसंस्कृतीचा जागर मांडणारी हीच ती कलावंत मंडळी होत. त्यांनी लोककलांचा वारसा जतन व वृद्धिंगत केला आहे. शाहिरी व गोंधळी अशा लोककलावंतांना राजदरबारी मोठा सन्मान असे.

शाहिरी व जागरण करणारे, यांना मोठा लोकाश्रयही लाभला आहे. गायनाबरोबरच विविध प्रकारची वाद्यांचे त्यांचे वादनकसबही वादातीत आहे. संबळ, दिमडी (खंजिरी), डफ, ताशा, ढोल, ढोलक, ढोलकी (नाल), हालगी, अशी लोकसांगीतिक वाद्ये वाजविण्याचेही एक शास्त्र आहे. या उपजत शास्त्राचीही एक परिभाषा आहे. या शास्त्राची जाण असलेले, खानदानी घराणेदार गायक-वादक, महाराष्ट्राच्या लोकधारामधील अठरापगड जातीच्या लोकसंस्कृतीमध्ये विखुरलेले आहेत. महाराष्ट्रामध्ये लोककला व लोककलावंतांची संस्कृती नगर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आढळते. नगर तालुक्यातील हातवळण या गावी गोंधळी लोकसंगीत व लोकसंस्कृतीचा जागर करणारी घराणेदार कलावंतांची खाणच आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या दरबारात प्रतिभावान गोंधळी कलाकार होते. अशा गोंधळी कलाकारांना राजदरबारी कलावंतांचा दर्जा असे. अशा राजदरबारी प्रतिभावान गोंधळी म्हणून सरदार अज्ञानदास यांना मोठा मानमरातब असे. त्यांचे दोन भाऊ सरदार तुळशीदास व सरदार गुणियादास अशी राजदरबारी गोंधळी व गुणवान कलाकारांची गायकीची घराणी होती.

अफजलखानाच्या वधाचा पहिला पोवाडा ज्यांनी तयार करून माँसाहेब जिजाऊ यांना म्हणून दाखवला, ते राजदरबारी शाहीर सरदार अज्ञानदास हे होते. माँसाहेबांनी खुश होऊन एक राजकंठी हार देऊन अज्ञानदास यांचा मोठा सन्मान केला होता. अज्ञानदासांची दहावी पिढी पेशवाईतील सरदार अंबादास पाचंगे, त्यांचा मुलगा सरदार मारोतीराव पाचंगे, हेसुद्धा पेशव्यांच्या राजदरबारात गोंधळी गायक-वादक म्हणून मोठे प्रतिभावंत कलावंत होते. वंशपरंपरेने मारोतीरावांचे चिरंजीव सरदार नानासाहेब पाचंगे (शिंदे) यांना ग्वाल्हेरच्या राजदरबारात गोंधळी 'राऊत' (राऊत ही इतिहासकारांची पदवी आहे.) म्हणून मोठी मानबरातब त्यांना होती. राऊतांच्या गोंधळी गाण्याला राऊतांचे गाणे असेही संबोधले जात असे.

नानासाहेबांच्या लोककलेला राजाश्रय होता. त्यांचा मुलगा सरदार महादेव पाचंगे (शिंदे) यांनीही देवीचे गोंधळी हा पारंपरिक वारसा पुढे पेशवाईमध्ये राजदरबारी गोंधळी गायक-वादक म्हणून चालविला. बाराव्या पिढीचे मारोतीराव पाचंगे



वैद्य महादेव नाना शिंदे

यांनाही महादजी शिंदे यांच्या दरबारात राजदरबारी गोंधळी म्हणून मोठा मानसन्मान होता. त्यांच्या या सांस्कृतिक कामगिरीचा सन्मान म्हणून शनिवारवाड्यात शिंदे सरकार यांनी मारोतीराव पाचंगे यांना 'शिंदेशाही पगडी' देऊन मोठा सन्मान केला होता. त्यातूनच मारोतीराव पाचंगे यांची पगडीवाले शिंदे अशी नवी ओळख निर्माण झाली. हळूहळू त्या सन्मानाचे आडनावात रूपांतर झाले. समाज



विद्यावाचस्पती पुरुषोत्तम महादेव शिंदे

त्यांना मारोतराव शिंदे या नावाने ओळखू लागला. मारोतीराव पाचंगे (शिंदे) यांचे नातू महादेवराव शिंदे (चौदावी पिढी) यांचे पुत्र व पंधराव्या पिढीचे शिलेदार पुरुषोत्तम यांनी सरदारकी व राजदरबारातील परंपरागत वारसा बदलून ते वारकरी भक्तिसंप्रदायाकडे वळाले व पंढरीच्या पांडुरंगाचे भक्त झाले. त्यांच्यातील अभ्यासूवृत्ती, गायकी, वंशपरंपरेने आलेले तालाचे ज्ञान या सर्व गुणग्राहकतेमुळे महादेवराव पाचंगे-शिंदे हे वारकरी संप्रदायातील मोठे कीर्तनकार म्हणून कीर्ती पावले. ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज शिंदे म्हणून त्यांना वारकरी संप्रदायामध्ये मोठा नावलौकिक प्राप्त झाला. लोककलेतील गोंधळी परंपरेला वारकरी सांप्रदायिक ज्ञानाचा साज त्यांनी चढविला. त्यामुळे गोंधळी कला प्रगल्भ झाली आणि शाक्त पंथीय कीर्तन परंपरेची सुरुवात झाली. गोंधळ हे शाक्त पंथीय कीर्तनच आहे. हे त्यांनी समाजाला पटवून दिले. आणि गोंधळाचे बाह्यांग शरीर हे जरी मनोरंजनाचे असले तरी आत्मा हा प्रबोधनाचाच आहे, हे सिद्धांत व दृष्टांतांसह सिद्ध केले आहे. त्यांच्या या अभ्यासपूर्ण वैचारिक भूमिकेमुळे वारकरी संप्रदायामध्ये त्यांचा मोठा लौकिक वाढला. फडाचे कीर्तनकार म्हणूनही त्यांची मोठी ख्याती झाली. त्यांची तीच परंपरा त्यांची दोन मुले पुढे चालवत आहेत. पहिले ह.भ.प पांडुरंग महाराज शिंदे हे संगीत अलंकार असून, वारकरी संत वाङ्मयाचे अभ्यासक म्हणून वारकरी भाविक-भक्तांमध्ये लोकप्रिय आहेत. केडगाव (ता. नगर) या ठिकाणी कायम निवासी व्यवस्था म्हणून स्वरसंध्या संगीत गुरुकुल आश्रम या नावाने संगीत विद्यादानाचे कार्य करीत आहेत.

हरिदास यांनी वारकरी संप्रदायात आळंदी-पंढरपूर येथे काही काळ कीर्तनकार महाराज, उत्कृष्ट पखवाजवादक, गायक असा लौकिक प्राप्त केला आहे. लोककलेमधील एकतारी भजनी, भारूडकार, गवळण, शाहिरी, गोंधळी, लोककलावंतांची पारंपरिक जागरण कला, संबळ वादन, दिमडीवादन, खंजिरीवादन असा बहुरंगी-बहुगुणी गायक वादक म्हणून सर्व कलांमध्ये पारंगत असे हरिदास यांचे व्यक्तिमत्त्व आहे. संत वाङ्मयातील लोकसंगीताचे अभ्यासक म्हणूनही राज्यभरात त्यांचा मोठा लौकिक आहे.

लोककलेमधील संबळ, दिमडी, डफ, ताशा, ढोल-ढोलक, तबला, पखवाज अशी वाद्ये वाजविणारे विद्यार्थी व सुमारे अडीचशे नवीन कलावंत त्यांनी घडविले आहेत.

## चित्रपटांसाठी गायन, संगीत

हरिदास यांनी तीस-पस्तीस चित्रपटांसाठी पार्श्वगायन, चित्रपटांसाठी पार्श्वसंगीत वादन केले आहे. अनेक मराठी व ऐतिहासिक चित्रपटांच्या संगीत विभागात योगदान देताना त्यांनी मोठे काम उभारले आहे. बाजीप्रभू देशपांडे यांच्या जीवनावरील 'पावनखिंड' या चित्रपटातील शौर्यकथा व संगीत विभागात त्यांनी मोठे योगदान दिले आहे. 'फत्तेशिकस्त' या चित्रपटाच्या संगीतातही मोठा सहभाग हरिदास शिंदे यांचा राहिला आहे. ऐतिहासिक चित्रपटांत हंबीरराव मोहिते, आनंदी गोपाळ, एक होते माळीण, अशा चित्रपटांमध्ये छोट्या भूमिका व संगीतकामी योगदान दिले आहे.


ZEE २४ तास
रहा एक पाऊल पुढे


NEW
POND'S
STARLIGHT

# मटा सन्मान २०२३ । मान

**सर्वोत्कृष्ट गीतकार**

- गुरु ठाकूर (तो चांदराती, चंद्रमुखी)
- जितेंद्र जोशी (खळ खळ गोदा, गोदावरी)
- वैभव जोशी (ही अनोखी गाठ, पांघरुण)
- माणिक-गणेश (लालेलाल झाला चाफा, गोष्ट एका पैठणीची)
- प्रसाद नामजोशी (सूर दे साज दे, सुमी)

**सर्वोत्कृष्ट संगीत दिग्दर्शक**

- अजय-अतुल (चंद्रमुखी)
- राहुल देशपांडे (मी वसंतराव)
- हितेश, सलील, पवनदीप, अजित (पांघरुण)
- रोहन-रोहन (सुमी)
- अविनाश-विश्वजीत, चिनार-महेश, नंदेश उमप (धर्मवीर : मुक्काम पोस्ट ठाणे)

**सर्वोत्कृष्ट पार्श्वगायक**

- मनिष राजगिरे (गुरुपौर्णिमा, धर्मवीर : मुक्काम पोस्ट ठाणे)
- अवधूत गांधी, हरिदास शिंदे (युगत मांडली, पावनखिंड)
- शंकर महादेवन (रे क्षणा, एकदा काय झालं)
- राहुल देशपांडे (मी वसंतराव)
- आनंद भाटे (देवे ठेविले तैसे, पांघरुण)






POND'S

Co-Presenting

ZEE २४ तास

# अनन्य सन्मान २०१७

कला

हरिदास शिंदे



तुम्ही जीवाभावाने जपली
परंपरा लोकसंगीताची
तुम्ही जगभर पोहोचवली
लोककला संबळवादनाची

बँडच्या माध्यमातून पुढे नेली
चळवळ लोकगीतांची
मान्यवर कलाकारांसोबत जुगलबंदी
रंगवली मैफल संगीताची

संबळ, दिमडीचे बोल म्हणजे
तुमचा श्वास
लोककलेचा जागर म्हणजे
तुमची जगण्याची आस

तुमच्या या संगीतसाधनेला सलाम
त्यासाठीच हा 'झी २४ तास अनन्य सन्मान'

# डॉ.सौ.धूत - मोहता व हरिदास शिंदे यांना सरगम सन्मान प्रदान

नगर- नगर सुंदरी वादन, संबळ व तबल्याची जुगलबंदी, संत वाङ्मयातील मार्गी संगीत आणि प्रसिद्ध गायिका कस्तुरी दातार अट्रावलकर यांचे शास्त्रीय गायन अशा बहारदार मैफिलीतून सरगमप्रेमी मित्र मंडळ आयोजित सरगम महोत्सव - २०१९ चिरस्मरणीय ठरला. या महोत्सवाचे हे ४१ वे वर्ष होते.

नगरच्या माऊली संकुल सभागृहात पार पडलेल्या या दोन दिवसीय संगीत महोत्सवात पहिल्या दिवसाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि नटराज पूजनाने झाली. त्यानंतर पुलवामा हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना, मागील वर्षात दिवंगत झालेल्या संगीत क्षेत्रातील व सरगम परिवारातील सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

नंतर सोलापूर येथील जगप्रसिद्ध सुंद्री वादक कपिल जाधव यांच्या सुंद्री वादनाने महोत्सवाला सुरवात झाली. त्यांना अमोल जाधव, बलभीम जाधव यांनी सुंद्री वादनाने साथ केली. चौघडा संगत विष्णू जाधव व तबला संगत अमोल माळी यांनी केली. नगरमध्ये प्रथमच हे सुंद्री वादन रसिकांना ऐकायला मिळाले. जाधव यांनी सुरुवातीला राग यमन सदर केला. तबला आणि चौघड्याच्या साथीने जाधव यांचे सुंदरी वादन उत्तरोत्तर खुलत गेले. विलंबित आणि द्रुत लयीत त्यांनी अनुक्रमे सादर केलेला ख्याल आणि बंदीश शास्त्रीय सुंद्री वादनाचा बहार रसिकांना बेहद खुश करून गेला.

सरगम महोत्सवात दरवर्षी संगीत क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या नगरच्या कलाकारांचा सरगम सन्मान देऊन गौरव करण्यात येतो. यावर्षीचा सन्मान नगरच्या सुकन्या आणि संगीत विषयात विद्यावाचस्पती उपाधी प्राप्त केलेल्या डॉ.सौ सुरुची धूत-मोहता आणि जगप्रसिद्ध संबळ वादक हरिदास शिंदे यांना देण्यात आला. यांचा 'सरगम सन्मान गौरव' सरगम कार्यसमिती सोबतच मोहनलाल मानधना व श्रीगोपाल धूत यांच्या हस्ते करण्यात आला. गौरव पत्र, सन्मानचिन्ह, शाल आणि श्रीफळ असे पुरस्काराचे स्वरूप होते. उपस्थितांनी सरगमप्रेमी मित्र मंडळाच्या संगीत सेवेचे आपल्या भाषणात कौतुक केले. पुरस्कारार्थींनी मंडळाबाबत कृतज्ञता व्यक्त केली. पुरस्कारार्थींचा परिचय सौ.अपर्णा बालटे यांनी करून दिला, गौरव पत्राचे वाचन मंडळाचे अध्यक्ष राम शिंदे यांनी केले.



सरगम प्रेमी मित्रमंडळातर्फे डॉ.सौ. सुरुची धूत- मोहता आणि संबळ वादक हरिदास शिंदे यांचा सरगम सन्मान पुरस्काराने सन्मान करण्यात आा. समवेत मोहनलाल मानधना, श्रीगोपाल धुत, सौ. अपर्णा बालटे, राम शिंदे, महेश कुलकर्णी, मनिष बोरा आदी.

दुसऱ्या सत्रात 'संत वाङ्मयातील मार्गी संगीत' हा भजन कीर्तन व लोकसंगीतातून दिव्यानुभूती देणारा कार्यक्रम हरिदास शिंदे, अवधूत गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सादर करून रसिकांची मने जिंकली. याचे निरुपण आणि संवादिनी वादन दिव्यांग कलाकार अभय नलगे यांनी आपल्या रसाळ वाणीतून केले. त्यांना तबला साथ पांडुरंग पवार यांनी केली. मृदुंगावर प्रसाद भांडवलकर होते. सहगायन पांडुरंग शिंदे आणि विजय सोनावणे यांनी केले. संत तुकाराम, संत ज्ञानेश्वर, संत चोखा मेळा यांची भजने आणि त्यावरील रसाळ निरुपणाने मैफिलीची उत्कंठा भैरवी भजनापर्यंत वाढवत गेली.

सोबत हरिदास शिंदे यांचे संबळ वादन, त्याला मृदंग आणि तबल्याची मिळालेली साथ, लय ताल यांची साधलेली एकरूपता उपस्थितांना परमानंदाची अनुभूती देऊन गेली. प्रत्येक भजनाला रसिकांनी दिलेली टाळ्या आणि नामस्मरणाची सामुहिक साथ अथांग भक्ती सागर उभा करणारी होती.

महोत्सवाचा दुसरा दिवस देखील लय ताल आणि स्वरांचा अनोखा संगम करणारा होता. पहिल्या सत्रात प्रसिद्ध तबला वादक अच्युत सुतार यांचे सोलो तबला वादन झाले. बनारस घराण्याचा बाज सांभाळत सुतार यांनी त्रितालात वादन केले. पेशकार, कायदे आणि तुकडे सादर करताना त्यांच्या वादनातील दमदारपणा स्पष्टपणे दिसला. त्यांना हार्मोनियमवर लेहरा संगत कल्याण मुरकुटे यांनी केली.

दुसरे सत्र प्रसिद्ध गायिका कस्तुरी दातार अट्रावलकर यांच्या शास्त्रीय व उपशास्त्रीय गायनाने गाजले. यावेळी त्यांचे पती हवाई दलाचे निवृत्त विंग कमांडर गिरीश अट्रावलकर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. पुलवामा हल्ल्याच्या स्मृती त्यांनी जागवल्या. भारत देशाच्या सीमांचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या त्यागाचा आपण आदर करणे आवश्यक आहे असे ते म्हणाले.

हवाई दलात आणि सैन्यात तरुण आणि युवतींनी येण्याचे आवाहन त्यांनी केले. त्याबद्दलच्या विविध संधीबाबत त्यांनी माहिती दिली. त्यांचा सत्कार मंडळाचे अध्यक्ष राम शिंदे यांनी सर्व कार्यसमितीसह केला. तेव्हा सभागृह भारत माता कि जय, वंदे मातरम च्या जयघोषाने दणाणले.

गायनात सौ. दातार यांनी सुरुवातीला राग बागेश्री सादर केला. विलंबित ख्याल आणि द्रुत बंदिश एकतालात बद्ध होती. सोहनी रागात सादर केलेला तराणा रसिकांची विशेष वाहवा घेऊन गेला. भैरवी रागात त्यांनी गायलेला अभंग तर उपस्थित रसिकांना भक्ती रसात चिंब करणारा होता.

सुमेरु पॅकेजिंग, रामकृष्ण अर्बन क्रेडिट सोसायटी, साईबन, आसरा ट्रेडर्स यांनी सहयोग दिला. कार्यक्रम प्रमुख म्हणून महेश कुलकर्णी आणि सहप्रमुख म्हणून मनिष बोरा यांनी काम पाहिले. सूत्रसंचलन सौ.अपर्णा बालटे आणि सौ.सविता तागडे यांनी केले. विश्वास जाधव, तुषार भांबरे, महेश लेले, दत्तात्रय साबळे आणि अन्य कार्यकारिणी सदस्य, त्याचप्रमाणे नादब्रह्म संगीतालयाचे श्रेयस शित्रे, उद्धव म्हस्के आणि अन्य विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. अवधूत गुरव यांनी ध्वनी व्यवस्था उत्तमपणे सांभाळली.



आंतरराष्ट्रीय साऊथ आफ्रिकन कलाकार मोमेडीओ डिबेट आणि हरिदास शिंदे रोहानियत फेस्टिवल पुणे येथे दि. १२ फेब्रु. २०१७ रोजी आपला परफॉरमन्स सादर करताना.




# शहनाईसोबतच संबळ, हलगीचाही कडकडाट

## गुरुवारी भीम जयंती मिरवणूक; १८ पथकांचा सहभाग

**धाराशिव, पुढारी वृत्तसेवा :** राज्यातील लोककलांचे दर्शन घडवत शहरात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी होणार आहे. गुरुवारी (दि. २०) निघणाऱ्या मिरवणुकीत राज्यभरातील १८ पथके सहभागी होणार असून यात बैंजो, बँड, हालकी, कडाकणी, संबळ तसेच शहनाई पथकांचा समावेश आहे.



दरवर्षी शहरातील धनंजय शिंगाडे अर्थात डीएस ग्रुपतर्फे २० एप्रिलरोजी भीमजयंतीनिमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन केले जाते. यंदाही याच पध्दतीने मिरवणूक निघणार असून यंदाच्या मिरवणुकीचे वैशिष्ट्य महाराष्ट्राच्या लोककलेशी जोडले आहे. राज्यभरातील नावाजलेली पथके शहरात आणली जाणार आहेत. यात कोल्हापुरातील प्रसिध्द अशा हालगी व कडकणीची दोन पथके आहेत. तर पुण्यातील आंतरराष्ट्रीय पातळीवर नावाजलेल्या संबळ पथकाचाही समावेश आहे. याबरोबरच बैंजो तसेच बँड पथकेही असतील. एक डॉल्बी असेल, असे संयोजक धनंजय शिंगाडे, समितीचे अध्यक्ष राजाभाऊ बगल यांनी सांगितले.

गुरुवारी सकाळी १० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात येणार आहे. तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात सकाळी १०.३० वाजता रक्तदान शिबीर होईल. दुपारी ४ वाजता क्रांती चौक, भिम नगर येथून मिरवणूकीस प्रारंभ होणार आहे. रात्री १२ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा येथे अतिषबाजीने मिरवणूकीचा समारोप होणार आहे.

या मिरवणूकीचे उद्घाटन जिल्हाधिकारी डॉ. सचिन ओम्बासे, मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल गुप्ता, पोलीस अधिक्षक अतुल कुलकर्णी, मुख्याधिकारी वसुधा फड यांच्या हस्ते होणार आहे. तसेच जिल्हयातील विविध राजकीय पक्ष, संस्था, संघटनांचे प्रतिनिधी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. मिरवणूकीस जास्तीत जास्त उपासकांनी सहभाग व्हावे असे आवाहन डी.एस. ग्रुपचे मार्गदर्शक धनंजय शिंगाडे व जयंती समारोह समितीचे अध्यक्ष राजाभाऊ बागल, कार्याध्यक्ष रावसाहेब शिंगाडे, उपाध्यक्ष बावेश काशिद/योगेश वाघमारे, कोषाध्यक्ष विशाल शिंगाडे, सचिव नितेश जानराव व आदि पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

### संबळ पथकाचे आकर्षण

**या मिरवणुकीचे सर्वात खास वैशिष्ट्य म्हणजे पुण्यातील रणधुमाळी संबळपथक. या पथकात ९ जणांचा समावेश असून आजपर्यंत १० देशात विविध आंतरराष्ट्रीय महोत्सवात या पथकाने सादरीकरण केले आहे. या सादरीकरणात पोतराज, गोंधळी, भोपी, शाहिरी, आराधी आदी कलाप्रकार दाखवले जातात, अशी माहिती पथकप्रमुख हरिदास शिंदे यांनी 'पुढारी'शी बोलताना दिली.**


ARTS
FESTIVAL
GOA


Vivo V11Pro
AI Dual Camera

## सरगमप्रेमी मित्र मंडळाच्या महोत्सवात रंगल्या

# सुंद्री, संबळ, तबला वादन, शास्त्रीय संगीत मैफली..



अहमदनगर | नगर सह्याद्री

सुंद्री वादन, संबळ व तबल्याची जुगलबंदी, संत वाङ्मयातील मार्गी संगीत आणि प्रसिद्ध गायिका कस्तुरी दातार अट्रावलकर यांचे शास्त्रीय गायन अशा बहारदार मैफलीतून सरगमप्रेमी मित्र मंडळ आयोजित सरगम महोत्सव - २०१९ चिरस्मरणीय ठरला.

माउली संकुल सभागृहात पार पडलेल्या या दोन दिवसीय संगीत महोत्सवात पहिल्या दिवसाची सुरुवात दीप प्रज्वलन आणि नटराज पूजनाने झाली. त्यानंतर पुलवामा हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना, मागील वर्षात दिवंगत झालेल्या संगीत क्षेत्रातील व सरगम परिवारातील सदस्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. सोलापूर येथील सुंद्री वादक कपिल जाधव यांच्या सुंद्री वादनाने महोत्सवाला सुरवात झाली. नगरमध्ये प्रथमच हे सुंद्री वादन रसिकांना ऐकायला मिळाले. जाधव यांनी सुरुवातीला राग यमन सदर केला. तबला आणि चौघड्याच्या साथीने जाधव यांचे सुंद्री वादन उत्तरोत्तर खुलत गेले. संगीत क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या नगरच्या कलाकारांचा सरगम सन्मान देऊन गौरव करण्यात येतो. यावर्षी डॉ. सुरुची धूत-मोहता आणि संबळ वादक हरिदास शिंदे यांना देण्यात आला. यांचा मसरगम सन्मान गौरव मोहन मानधना व श्रीगोपाल जाखोटिया यांच्या हस्ते करण्यात आला. पुरस्कारार्थींनी मंडळाबाबत कृतज्ञता व्यक्त केली. महोत्सवाचा दुसरा दिवस देखील लय ताल आणि स्वरांचा अनोखा संगम करणारा होता.

**Bharatiya Vidya Bhavan & Infosys Foundation**

*Present*

## Cultural Outreach Programme

भारतीय विद्या भवन - इन्फोसिस फाऊंडेशन

सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमाअंतर्गत सादर करीत आहे

Programme No.169

स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्,

(भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालय,पुणे) प्रस्तुत

# स्वर भारती

महाराष्ट्राचे लोक संगीत

गण गवळण, भारूड, पोवाडा, बेदिक भजन, गोंधळ - जागरण



सादरकर्ते

**श्री. हरिदास शिंदे व संच**

'स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस्' येथील विद्यार्थी व प्रसिद्ध गायक



**Sunday, 25th June 2023 | 5.30 p.m.**

**Venue : Bharatiya Vidya Bhavan's**
**Sardar Mahadev Balwant Natu Sabhagriha**

407-408 Shivajinagar, Off Senapati Bapat Road, Opp. Hotel Marriot Lane, Pune - 411 016.

सस्नेह निमंत्रण

All are Cordially Invited

## डॉ. सुरुची, धूत, हरिदास शिंदे यांना 'सरगम सन्मान' प्रदान

# बहारदार गायनाने 'सरगम महोत्सव' अविस्मरणीय






कृषि विभाग
MILLETS
2023
श्री तुळजाभवानी
कृषि महोत्सव
धाराशिव २०२४
वाटचाल प्रगतीची
शेतकऱ्यांच्या उन्नतीची..!
परिसंवाद, चर्चासत्र व सांस्कृतीक कार्यक्रम
श्री तुळजाभवानी
कृषि महोत्सव
धाराशिव -२०२४
वारसा महाराष्ट्राचा
चौथा दिवस
रविवार,
दि. २१/०१/२०२४
सायं ५ ते ९
महाराष्ट्राची लोकसंगीत हरिदास शिंदे, लोकसंस्कृत
कला सेवा संघ, पुणे-अहमदनगर, महाराष्ट्र राज्य